12-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/11/2025 10:27 PM Page 1



# पाया मजबूत करण्यासाठी पंचायतींचे योगदान

## मुख्ययमंत्री डॉ. प्रमोद सावंत | आमोणा क्षेत्रात विविध विकास योजनांचा प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ११ :** स्वयंपूर्ण आत्मनिर्भर गोवा होणारा खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यासाठी ग्रामीण भागातील पंचायतींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, त्यांनी गावातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देत १००% लागवडीसाठी सरकारच्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा.

हरित धवलक्रांती बरोबरच कचरा मुक्त गाव ही आमची संकल्पना आहे. कचऱ्याच्या बाबतीत सरकार भूमिका बजावत असते. रस्त्यावर कचरा टाकाल तर यांची खैर नाही, गावाच्या विकासात सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. सर्व घटक एकत्र आले तरच ग्रामीण विकास आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण गाव होणे शक्य, असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी आमोणा येथे केले. आमोणा पंचायत क्षेत्रात पंचायत इमारत कार्यालयाचे नूतनिकृत उद्घाटन, वेदांता कंपनीतर्फे मैदानाची पायाभरणी तसेच शाळेसाठी प्रयोगशाळा, स्वच्छ भारत अभियानातर्फे उभारण्यात सुसज्ञ कचरा शेड तसेच विद्यार्थी गौरव सोहळा अशा विविध कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते.

वेदांताने आमोणा गावाबरोबरच गोव्याच्या विविध भागात शिक्षण आरोग्य पायाभूत सुविधा क्रीडा अधिक क्षेत्रात भरीव योगदान देताना सामाजिक दायित्व निभावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. आमोणा गावात नवनवीन क्रीडापटू निर्माण व्हावेत. यासाठी क्रीडा प्रकल्प, बालमनावर नाविन्याची व नवनवीन शिकण्याची आस्था निर्माण व्हावी. या शाळेसाठी बालवयातच संशोधनाचे प्रशिक्षण देणे स्तुत्य उपक्रम आहे. त्याप्रयोग शाळासाठी अभिनव उपक्रम आहेत.

आमोणा गावात ४० कोटी रुपये खर्चून बांध बांधण्यात आले असून शेतीसाठी वरदान ठरलेल्या या गावात एकही जमीन पडीक राहणार नाही याची खबरदारी पंचायतीने घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

मी शेती लागवडी साठी उत्सुक आमोणा गावात मोठ्या प्रमाणात शेती आहे. बरेच लोक शेती पडीक ठेवत आहेत. जे पडित ठेवतात त्याने ती जमीन दुसऱ्याला लागवडसाठी द्यावी ज्यांना शक्य नाही त्यांनी ती मला द्यावी मी स्वतः शेती लागवड करण्यासाठी उत्सुक असून त्यासाठी प्रामाणिकपणे योगदान देईल असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी सांगितले. यावेळी सरपंच सागर फडते, गौरवी गावस, कृष्णा गावस, रोहिदास कानसेकर, इतर पंच सदस्य, भाजपाध्यक्ष रामा नाईक, मंडळ अध्यक्ष गोपाळ सुर्लीकर, गुर वेदांता कंपनीचे सपतेश सरदेसाई तसेच इतर पंचायत सदस्य आदी यावेळी उपस्थित होते.



आमोणा : पंचायत क्षेत्रात विविध विकास योजनांचा प्रारंभ करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत सरपंच सागर फडते, सपतेश सरदेसाई, रामा गावस, कृष्णा गावस, गोपाळ सुर्लीकर, पंचायत सदस्य व इतर.

यावेळी दीपप्रज्वलाने विविध कार्यक्रमांचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. वेदांतातर्फे विद्यार्थी गौरव पुरस्कारांचे वितरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला सपतेश सर देसाई यांनी आमो णा गावात क्रीडा, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा अशा वेगवेगळ्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपत काम करण्यास आनंद होत आहे. त्या ठिकाणी असलेल्या शाळेला प्रयोगशाळा प्रदान करताना बालमनावर नाविन्याची आवड निर्माण व्हावी व संशोधन दृष्टी वाढावी. यासाठी आमचे प्रयत्न असल्याचे सांगितले. सरपंच सागर फडते यांनी आमोणा गावातील विविध योजनांची माहिती देताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या पूर्ण सहकार्यातून तसेच व दांत कंपनीच्या सहकार्यातून अनेक योजनां मार्गी लागल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले.

पान १ वरून

### १०० पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केल्याचा भारताचा दावा !

ही चर्चा केवळ जनतेसाठीच नव्हे, तर त्यांच्या प्रतिनिधींसाठीही महत्त्वाची आहे. आपण या आव्हानांना सामोरे जाण्याचा निर्धार एकत्रितपणे दाखवू शकतो,असेही त्यांनी म्हटले आहे.
त्यांनी आपल्या पत्रात पंतप्रधान मोदींना आवाहन केले आहे की, आपण या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरच पुढाकार घ्याल, असा मला विश्वास आहे. दरम्यान, भारतीय हवाई दलाने रविवारी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या समाजमाध्यमावर पोस्ट करत सांगितले की, ऑपरेशन सिंदूर अद्याप सुरू आहे. यासंबंधी अधिक माहिती योग्य वेळी जाहीर करण्यात येईल. हवाई दलाने नमूद केले की, ऑपरेशन सिंदूरमधील जबाबदाऱ्या अचूक, व्यावसायिक आणि विवेकपूर्ण पद्धतीने पार पाडल्या गेल्या असून त्या राष्ट्रीय हित लक्षात घेऊन आखलेल्या होत्या.

# ‘अनुभवाचे बोल’ पुस्तकाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** ‘अनुभवाचे बोल’ हे पुस्तक लिहून गौरी वेर्लेकर यांनी ललित साहित्यात टाकलेले पाऊल कौतुकास्पद आहे. जीवनातील प्रश्नांना त्यांनी स्पर्श केला आहे. या लेखनात नुसते लालित्य नाही तर विचारांची श्रीमंती आहे. कमी शब्दात चांगले अनुभव त्यांनी मांडले आहेत, असे प्रतिपादन गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष तथा समीक्षक प्राचार्य अनिल सामंत यांनी येथे केले.

रविवारी आयएमबी च्या छोटेखानी सभागृहात गौरी वेर्लेकर यांच्या अनुभवाचे बोल या ललित लेख संग्रहाचे प्रकाशन केल्यानंतर अध्यक्षस्थानावरून प्राचार्य सामंत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे लेखक शशिकांत पुनाजी , लेखिका मंजिरी वाटवे व गौरी वेर्लेकर उपस्थित होत्या. शशिकांत पुनाजी म्हणाले, गौरी वेर्लेकर यांनी त्यांच्या या पहिल्या पहिल्या पुस्तकात साध्या शब्दात अनुभवांचे संचित उलगडून दाखवले आहे. यात मनाला भिडणारे विषय आहेत. साधे सोपे लिहिणे हे कठीण असते. दर्जेदार लिहिण्यासाठी वाचन दांडगे हवे. सोनचाफा प्रकाशन तर्फे प्रकाशित केलेल्या या पुस्तकाला पत्रकार तथा कवी सद्गुरू पाटील यांची प्रस्तावना लाभली आहे. गौरी वेर्लेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आपले काका प्रदीप कारेकर यांनी आपल्याला लिहायला प्रोत्साहन दिले. प्राचार्य अनिल सामंत हे शिक्षक लाभले आणि साहित्याची गोडी लागली. मला अस्वस्थ वाटते तेव्हा माझी लेखणी मला तणावमुक्त करते. लेखणीद्वारे कागदावर शब्द उमटतात तेव्हा मनस्वास्थ्य लाभते. नव्या व प्रहा वेर्लेकर यांनी पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. कवी संगम भोसले यांनी सूत्रसंचालन केले तर रोशन वेर्लेकर यांनी आभार मानले.



पणजी : ‘अनुभवाचे बोल’ पुस्तकाचे प्रकाशन करतांना प्राचार्य अनिल सामंत सोबतसंगम भोसले, रोशन वेर्लेकर, गौरी वेर्लेकर, शशिकांत पुनाजी व मंजिरी वाटवे.

# साखळीत ‘चला बोलूया’ निवासी शिबिर उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. ११ :** साखळी येथील संवेदन केंद्रातर्फे कातकरी मुलांसाठी आयोजित 'चला बोलूया' हे सात दिवसीय निवासी शिबिर विविध उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाले. कुडणे-साखळी येथील सरकारी प्राथमिक विद्यालयात हे शिबिर पार पडले. या शिबिरात कातकरी आणि इतर समाजातील मिळून एकूण ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

शिबिराचे उद्घटन डिचोली तालुका भागशिक्षण अधिकारी संज्योती पावसकर यांच्या हस्ते, हुतात्मा सोमा रामा मळीक यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी कुडणे ग्रामपंचायतीचे सरपंच बाबला मळीक, पणजी रिव्हेरिया रोटरी क्लबच्या अध्यक्षा तन्वी सावंत, रोटरी क्लबचे सदस्य शिवा नाईक, फोंड्याचे समाजसेवक रौफ मुल्ला, समाजसेवक राहुल शेट वेरेकर, सरकारी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता गाड, प्रमुख शिक्षिका दीपश्री गावस, पालक-शिक्षक संघाचे अध्यक्ष शंकर मळीक, संवेदन केंद्राच्या अध्यक्षा माधवी राणे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी मुलांच्या हाताला समानतेचा धागा बांधण्यात आला आणि पाच प्रकारच्या धान्यांचे रोपण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी मान्यवरांनी संवेदन केंद्राच्या कार्याची प्रशंसा केली.



शिबिरात प्राथमिक गट व कुमारवयीन गट अशा दोन गटांमध्ये स्वतंत्र कार्यक्रम राबवण्यात आले. प्राथमिक गटासाठी नवसो परवार यांनी क्राफ्ट व ओरिगामी कार्यशाळा घेतली. ऐश्वर्या चारी यांनी वापरलेल्या कपड्यांपासून पायपुसणी तयार करण्याचे प्रात्यक्षिक दिले. सूर्यकांत गावकर यांनी निसर्गातील पानांपासून शोभेच्या वस्तू तयार करण्याचे मार्गदर्शन केले. समृद्धी गणपुले यांनी शिक्षणात्मक खेळ व गाण्यांच्या माध्यमातून सत्र घेतले.

या सात दिवशीय संपूर्ण शिबिरात कुडणे गावातील कार्यकर्ते मंडळींनी मदत आणि सहकार्य केलेले आहे. पाणी व इतर गरज या मंडळींनी दिली आहे. यात पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष शंकर मळीक, उपाध्यक्ष प्रशांत राणे, कार्यकर्ते प्रतापराव राणे, परेश खांडेकर, लक्ष्मण गावस, रेश्मा गावस, कृष्णा शिरगांवकर आदींनी मदत केली. तसेच सरकारी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता गाड आणि इतर शिक्षक वर्गाने सहकार्य केले. शिबिराच्या समारोप प्रसंगी फोंड्याचे सामाजिक कार्यकर्ते प्रमोद सावंत, शिक्षक गुरुदास सुतार, स्थलांतरित कामगारांच्या शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या खुशश्री सावंत, नाट्य प्रशिक्षक अजय फोंडेकर, संवेदन केंद्राचे उपाध्यक्ष दिनेश सावंत, खजिनदार देवानंद गावडे आणि शिबिर प्रमुख अंगारिका सावंत उपस्थित होते. यावेळी शिबिरार्थींना प्रमाणपत्रे तसेच उत्कृष्ट शिबिरार्थी बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षता माईणकर व नमन सावंत यांनी आभार मानले.

सात दिवस चालणाऱ्या या शिबिराला संवेदन केंद्राच्या कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले. शिबिर यशस्वी होण्यासाठी प्रकल्प समन्वयक दशरथ मोरजकर, प्रकल्प प्रशिक्षक बाबनी मापारी, नमन सावंत, देवानंद गावडे, माधवी राणे, स्नेहा सबनीस, दिनेश सावंत, रेश्मा मोरजकर, ज्योती धुरी, अंगारिका सावंत, अक्षता माईणकर, सुनिल केरकर, वैष्णवी गांवकर, सिद्धी माईणकर, तन्वी केरकर, आर्या वझे, श्रेया दळवी, स्नेहा गावस, कविता यमकर, बेबीनाझ यांचे योगदान लाभले. तसेच बिमली पवार, शालन पवार व विश्रांती निकम या कातकरी महिलांचे योगदान लाभले.

# सातेरी देवीच्या वर्धापनदिनानिमत्त गावातील महिलांतर्फे नाटक सादर



सत्तरी : सादर केलेल्या नाटकातील पाडेली सत्तरी येथील महिला कलाकार.

■ टीम दैनिक हेराल्ड

**गुळेली, दि. १० :** पाडेली सत्तरी येथील श्री सातेरी देवीचा ३६वा वर्धापनदिन नुकताच झाला. यानिमित्त गावातील महिलांतर्फे ‘आंगश्यो मांगश्यो’ हे कोंकणी विनोदी नाटक सादर केले.

यात लेखक महेश नाईक, दिग्दर्शक गोरक्षनाथ राणे, यात सुमिना गावडे, हेमांगी नाईक,अलिशा गावडे, अक्षदा गावकर, सरिता गावडे, हर्षदा गावकर, सिया गावडे, कल्पिता गावडे, संगमी गावडे, रिया गावडे, विद्या गावडे, कीर्ती गावकर, प्रियंका गावडे व दामिनी गावकर आदी महिला कलाकार सहभागी झाले होते.

वर्धापन दिनानिमित्त सकाळपासून धार्मिक कार्यक्रम तसेच संध्याकाळी स्थानिक महिला कलाकारांची दिंडी रात्री स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम झाला.

# डिचोलीत अखेर कलाभवनचे स्वप्न साकारणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ११ :** कलाकारांची भूमी अशी ख्याती असलेल्या डिचोलीच्या ऐतिहासिक सुवर्णभूमीत कित्येक वर्षानंतर कला भवनाची मागणी मान्य झाल्या आहेत. ६०० प्रेक्षकांची व्यवस्था असलेल्या या कला भवनाची उभारणी प्रशासकीय इमारतीच्या संकुलात होणार असून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते या संकुलाची पायाभरणी होणार आहे.

**▶ ६०० प्रेक्षकक्षमतेचे सुसज्ञ कला भवन : मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी**

अनेक वर्ष डिचोली रवींद्र भवन उभारण्यात यावे ही मागणी कलाकार व स्थानिकांनी लावून धरली होती. अनेक संधी आल्या पण त्या संधीचे सोने करणे शक्य झाले नाही त्याला राजकीय श्रेयवादाचाही फटका बसला पांडुरंग राऊत मंत्री असताना ही प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र त्यानंतर रवींद्र भवन साखळीत साकारले.



त्यानंतर अनेक वर्ष ही मागणी चर्चेत होती आज त्याला मूहूर्त लाभला असून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, आमदार चंद्रकांत शेट्ये यांच्या प्रयत्नाने डिचोली त कलाकारांसाठी

सुसज्ञ कला भवन आगामी दोन वर्षात साकारणार आहे. त्यामुळे डिचोलीवासीयांनी समाधान व्यक्त केलेले आहे.

८० कोटी रुपये खर्चून प्रशासकीय संकुलात हे कला भवन एका वेगळ्या व्यवस्थेत उभारण्यात येणार आहे. या कलभवांना त अनेक सुविधा बहाल करण्यात येणार असून त्यामध्ये आधुनिक दर्जाची साऊंड सिस्टम वाचनालय तसेच रवींद्र भवन च्या धरतीवर अनेक सुविधा बहाल करण्यात येणार असल्याची माहिती आमदार डॉ. चंद्रकांत शेटये यांनी दिली. पहिल्या टप्प्यात ८० कोटी खर्चून प्रशासकीय संकुल उभारण्यात येत आहे, त्यात कला भवन इमारत पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच इतर सुविधा आहेत त्या करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

# कमल दत्ता यांची श्रीस्थळ जैव विविधता व्यवस्थापन समितीचे कौतुक




काणकोण, श्रीस्थळ : जैव विविधता व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांसह प्रधान मुख्य वन संरक्षक कमल दत्ता आय. एफ. एस. व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ११ :** काणकोण, श्रीस्थळ येथील जैव विविधता व्यवस्थापन समितीला प्रधान मुख्य वन संरक्षक कमल दत्ता आय.एफ.एस. यांनी भेट दिली आणि जैवविविधतेशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. त्यांनी श्रीस्थळ समिती राबवत असलेल्या उपक्रमांचे आणि कामकाजाचे कौतुक करून आणि जैवविविधतेशी संबंधित प्रकल्पांना पूर्ण पाठिंबा दिला.

त्यांच्या पूर्ण दिवसाच्या दौऱ्यात त्यांनी गुळे येथे वाढलेल्या 'घोडेपाईक' सेक्टरला भेट दिली. जेर्मल वृक्ष आणि श्री मल्लिकार्जुन मंदिर तसेच पर्तगा मठ येथील वडाच्या झाडाला भेट दिली.

सरपंच सेजल गावकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तर स्थानिक पंच सदस्य अक्षदा वेळीप आणि नीलेश गाकर यांनी बीएमसी सदस्या अंजली गावकर आणि तेजस नाईक गावकर यांच्यासह पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. समिती सदस्य आणि या भेटीचे समन्वयक शिरिश पै यांनी बीएमसीच्या कामकाजाची माहिती दिली. पंच गणेश गावकर यांनी वनाशी संबंधित काही मुद्दे उपस्थित केले. तर बीएमसी अध्यक्ष विनय तुबकी यांनी आभार मानले.

**IN THE COURT OF CIVIL JUDGE JUNIOR DIVISION SATTARI AT VALPOI**
Regular Civil Suit No: 4/2025
To,
Mr. Gaspar Caetano Fernandes ...Plaintiffs
V/s
Mr. Paulo Fernandes ...Defendants
**To,**
**Defendant:-**
Mr. Paulo Fernandes
Sorvem Vaddo,
Near Our Lady of Assumption Chapel
H.No. 220, Saibinichem Bhat
Guirim Bardez - Goa.
Pin 403 507.
**WHEREAS** the above named Plaintiff have instituted a suit against you in this Court for Permanent and Mandatory Injunction (under sec 38 of Specific Relief Act 1963).
**And WHEREAS** the summons/notices issued to you on the above mentioned address has been returned unserved.
**And WHEREAS** the above named plaintiff has filed an application in this Court praying that you be served by substitute service by publishing the same in any daily newspaper having circulation in said locality i.e "O Heraldo" and whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.
**NOW THEREFORE,** notice is hereby given to you to appear before this Court either in person or by a pleader duly instructed on **24.06.2025 at 10.00 a.m** to answer the claim and further you are hereby directed to file on that day a written statement.
Take notice that, in default or your appearance on that day and time aforementioned, the matter will be heard and determined in your absence.
Given under my hand and the seal of the Court, this 9th day of May, 2025.
Sd/- **(Akshata A. Kale)**
Civil Judge Junior Division,
Sattari at Valpoi
SEAL

# मंदिरे शैक्षणिक केंद्रे होणे आवश्यक

## मंत्री सुभाष शिरोडकर | वळवई येथील महादेव मंदिराचे नव्याने बांधलेल्या तळीचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ११ :** मंदिरे ही बलस्थान असल्याने अध्यात्मिकता, भक्ती भावना व सांस्कृतिक केंद्राबरोबरच मंदिरे ही शैक्षणिक केंद्रे होणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत मंदिरे ही शैक्षणिक केंद्रे होत नाहीत तोपर्यंत मंदिरांची पुनर्बांधणी करून ती फायदेशीर ठरणार नाहीत अन् बहुजन समाजाची प्रगती होणार नाही, असे प्रतिपादन जलस्त्रोत मंत्री सुभाष शिरोडकर यांनी केले.

वळवई ग्रामपंचायत क्षेत्रातील महादेवभाट - वळवई येथील श्री महादेव मंदिराच्या जलस्त्रोत खात्यातर्फे नव्याने बांधण्यात आलेल्या तळीच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.जलस्त्रोत खात्यातर्फे १७ लाख ६६ हजार रुपये खर्चून तळीचे बांधकाम करण्यात आले आहे.यावेळी व्यासपीठावर जलस्त्रोत मंत्री सुभाष शिरोडकरांसह कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, बेतकी खांडोळा सरपंच विशांत नाईक, वळवईचे सरपंच विनायक वेंगुर्लेकर, अभियंता विशांत नाईक, उपसरपंच मिताली शेट ,पंच सदस्य सर्वेश नाईक, काशिनाथ नाईक, अंजली वेंगुर्लेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



वळवई : महादेव मंदिराच्या नूतन तळीच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मंत्री सुभाष शिरोडकर, मंत्री गोविंद गावडे, विनायक वेंगुर्लेकर व इतर.

मंत्री शिरोडकर पुढे म्हणाले की, गोवा मुक्तीपूर्वी बहुजन समाजाची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे समाजाला मंदिराची पुनर्बांधणी करण्यास शक्य होत नव्हते.गोवा मुक्तीनंतर समाजाची आर्थिक उन्नती होताच गोव्यातील मंदिरांची पुनर्बांधणी मोठ्या प्रमाणात होऊ लागली. मंदिरांच्या परिसरातून कला व संस्कृतीबरोबरच शैक्षणिक क्षेत्राला उभारी देण्याचा प्रयत्न प्रत्येक देवस्थान समितीने करायला हवा.

मंत्री गोविंद गावडे म्हणाले की श्री महादेव मंदिराच्या तळीचे सौंदर्यीकरण हे मौलिक आहे.या मंदिराच्या परिसरातील असलेली अन्य प्रलंबित कामे येत्या डिसेंबरपर्यंत मार्गी लावली जातील व महादेव मंदिराचे ठिकाण हे पर्यटन स्थळ करण्यासाठी प्रयत्न करू. माझ्या आठ वर्षांच्या आमदारकीच्या कारकीर्दीत प्रियोळ मतदारसंघातील अत्यंत गरजवंत अशा विकासकामांना मी प्राधान्य देऊन ती मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.भविष्यात विकासकामांच्या साधन सुविधांचा मुलांनी आधार घेत जेव्हा मुले स्वतः चा व्यक्तिमत्त्व विकास साधेल तेव्हाच आमचा विजय होईल.

यावेळी सरपंच विनायक वेंगुर्लेकर यांनी महादेव मंदिराचे काम पूर्णत्वास आल्यावर वळवई गाव हा पर्यटन स्थळ म्हणून ओळखला जाणार आहे. सर्वप्रथम मंत्री सुभाष शिरोडकर यांच्या हस्ते नामकरण फलकाचे अनावरण तसेच फित कापून तळीच्या बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले.देवस्थानचे अध्यक्ष सुभाष नाईक यांनी प्रास्ताविकपर विचार मांडले.सूत्रनिवेदन काशिनाथ नाईक यांनी केले तर समीर नाईक यांनी आभार मानले.